**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# प्राचीन भारतातील स्त्रिशिक्षण

**प्रा. डॉ. आर. पी. झनके**
*इतिहास विभागप्रमुख,*
*स्व. भा. शि. कला, प्रा. ना. गा. विज्ञान व आ. गा. वाणिज्य महाविद्यालय सा. खेर्डा*
*ता. सि.राजा जि. बुलडाणा*
***Corresponding Author – प्रा. डॉ. आर. पी. झनके***
**DOI - 10.5281/zenodo.15247403**

भारतीय संस्कृतीचा प्रारंभबिंदू म्हणजे हडप्पा संस्कृती होय. ही संस्कृती पुढारलेली असली तरी त्यावेळच्या शिक्षणाविषयी निश्चित माहिती देता येत नाही. मात्र या संस्कृतीत चित्रलिपीतुन लेखनकला अवगत होती. प्राचीन शैक्षणिक विकासाची वाटचाल तपासतांना वैदिककाळ, मौर्यकाळ, गुप्तकाळात व पुढच्या हर्षवर्धनाच्याकाळात भारतातील शिक्षणाचा दर्जा एकदम उंचावला व ते जागतीक किर्तीचे बनले. म्हणजे प्रारंभी गुरूच्या आश्रमात व घरी शिक्षण घेणारा विद्यार्थी नंतर विद्यापीठात शिक्षण घेतांना दिसतो. हे शिक्षणातील बदल खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### अ) वैदिक कालखंडातील शिक्षण –

भारतीय शिक्षणपध्दती ही आपल्या संस्कृती इतकीच पुरातन असुन मनुष्याला आदर्श जीवन जगण्यास प्रवृत्त करणे हा शिक्षणाचा प्रमुख हेतू होता. वैदिक काळ शिक्षणाच्या दृष्टीने समृध्द होता. त्यातील अध्ययन प्रक्रिया मौखिक स्वरुपाची होती. स्त्रियांना शिक्षणाचे पुर्ण स्वातंत्र्य होते. म्हणुनच लोपामुद्रा, मैत्रेयी, अपालात्रैयी, गार्गी, घोषा, विश्ववारा हया मोठया विदुषी होऊन गेल्यात. प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण कुटुंबातही मिळत होते. प्रारंभीच्या शिक्षणात सामुहिक मंत्रोच्चार करण्यावर भर होता.

उत्तर वैदिक काळात शिक्षणाची एक निश्चित पध्दती बांधण्यात आली. आर्यांच्या आश्रमव्यवस्थेतील ब्रम्हचर्याश्रम हा शिक्षणाचा कालखंड होता. मुलाचा उपनयन संस्कार झाल्यानंतर त्याला गुरूच्या आश्रमात पाठविले जाई. साधारणत: १२ वर्षाचा काळ असुन त्यात वेद, ब्रम्हविद्या या सोबतच वर्णनुसार शिक्षण मिळत असे. गुरूच्या आश्रमात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य एकत्र असत. ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांच्या शारीरीक व मानसिक उन्नतीकडेही लक्ष दिले जाई. प्रत्येक विद्यार्थ्याला शिस्तबध्द जीवन जगावे लागत असे.

शिक्षणात पाठांतर व स्मृतीत ठेवण्याला महत्व होते. अध्यापनात प्रश्नोत्तराचा समावेश असुन प्रश्न दोन्ही बाजुने विचारत होते. त्यावरून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची खोली समजत असे. शिकविलेल्या ज्ञानावर विद्यार्थी चिंतन व मनन करत होते. शिक्षण संपल्यानंतर गुरूदक्षिणा देण्याची प्रथा होती.

### ब) महाकाव्य काळातील शिक्षण –

या काळातही वैदिक काळाप्रमाणेच गुरूकुलाची परंपरा असुन गुरूंच्या आश्रमात किंवा घरी शिक्षणाचे कार्य चालत असुन समाजातही शिक्षणाची प्रतिष्ठा वाढल्याचे दिसुन येते. या काळातील राजे अधूनमधून विद्वानांच्या संभांचे आयोजन करीत असत. तात्वीक विषयांवर खुप चर्चा होत असे. रामायणकाळात वाल्मिकी व भारद्वाज हे तर महाभारत काळात कण्व व मार्कंडेय या ऋषींचे आश्रम प्रसिध्द होते. गृहत्यागानंतर सिता वाल्मिकीच्या

आश्रमात होती. तेथेच लव आणि कुश यांना रामायणाचे धडे मिळाले. या काळात शिक्षणाचे क्षेत्र व्यापक बनले होते. वेदविद्या, मिमांसा, राजनिती, इतिहास, खगोल, ज्योतिष्य, चिकित्सा, धनुर्वीद्या अशा अनेक शास्त्रांचे शिक्षण मिळत होते. या काळात मुलांना घरीच शिक्षण देण्यासाठी प्रख्यात आचार्यांची नियुक्ती करण्याची पध्दती सुरू झाली. शिक्षणात वास्तुशास्त्र व तंत्रज्ञान यांचा विकास झाला होता.

महाभारत काळात शिक्षण प्रणालीत थोडा बदल होऊन शिक्षणात उच्च–कनिष्ठ भावना बळावली होती. तसेच गुरू–शिष्य परंपरा सुरू झाली. एकलव्य व द्रोणाचार्य यांच्यातील संबंध शिक्षणव्यवस्थेला काळीमा फासणारा ठरला. मात्र ज्ञानार्जनासाठी गुरूची आवश्यकता असल्याचे समाजमनावर बिंबविण्यात आल्याचे दिसते. उच्च शिक्षणाला व विचारांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होत होती.

### क) मौर्यकालीन शिक्षण –

मौर्यकाळातही शिक्षणपध्दती वेदकाळासारखीच असुन वयाच्या ६ व्या ७ व्या वर्षी मुलाचा उपनयन संस्कार होऊन तो विद्यार्थी बनत होता. त्याच्या गळयात जानवे म्हणजे विद्याभ्यासाचे बंधन होते. अध्ययनासाठी गुरूच्या घरी किंवा आश्रमात जाऊन वैदिक साहित्य, धर्मशास्त्र, इतिहास, व्याकरण, अर्थशास्त्र, राजनिती इत्यादी विषयाचा अभ्यास होत असे. शिवाय क्षत्रियांना लष्करी शिक्षण दिले जाई. मौर्यकाळात लेखनकलेचा विकास झाला होता. तरीही अध्ययन प्रामुख्याने मौखिक स्परूपाचे होते.

मौर्यकाळात शिक्षणाचा खुपच प्रसार झाला. मोठमोठया शैक्षणिक केंद्रांना विद्यापीठाचा दर्जा याच काळात प्राप्त झाला. त्यात तक्षशिला हे भारतातील सर्वांत प्राचीन विद्यापीठ नावारूपास आले. तेथे वेद, तर्कशास्त्र, व्याकरण, राजनिती, लष्कर असे सर्व प्रकारचे शिक्षण मिळत होते. शिवाय मौर्यकाळात पाटलीपुत्र, राजगृह, काशी, वल्लभी ही मोठी शिक्षणकेंद्रे होती. संस्कृतचे सर्वांत मोठे केंद्र काशी येथे होते. ते वेदविद्या व धार्मिक शिक्षणासाठी प्रसिध्द होते. गुजरातमधील वल्लभी यालाही विद्यापीठाचा दर्जा प्राप्त होऊन तेथे हीनयान पंथाचे वर्चस्व होते. तेथील विद्वानांना सर्वत्र मानसन्मान होता.

### ड) गुप्तकालीन शिक्षण –

या काळात परंपरागत शिक्षणपध्दती अस्तित्वात होती. बौध्दमठ व विहारांतुनही शिक्षण दिल्या जात होते. तेथे वेदांचेही शिक्षण दिले जाई. खेड्यात ब्राम्हणवर्ग विद्यादान करत होता. संस्कृत भाषेत पुराण निर्मीती याच काळात झाली. या काळात उच्च वर्गात शिक्षणाचे प्रमाण जास्त होते. गुप्तकाळातच फाहीयान भारतात आला होता. या काळात शिक्षण विकासाला गती येऊन साहित्यक्षेत्रात भरीव कामगीरी झाली.

गुप्त सम्राट स्वत: विद्वान असुन विद्वानांचे आश्रयदाते होते. चंद्रगुप्ताच्या नवरत्न दरबारात विद्वानांचा जास्त भरणा होता. महानायक कवी व नाटककार कालीदास, गणिती तत्वज्ञ आर्यभट्ट, खगोलशास्त्रज्ञ ज्योतिषशास्त्रज्ञ वराहमिहीर असे प्रभावी विद्वान मौर्यकाळातच होऊन गेले. या काळातील शिक्षणाने मानवी जीवनाच्या सर्वच अंगांना विकसीत केले. तक्षशिला, काशी, वल्लभी या विद्यापीठांबरोबरच उज्जयिनी, नालंदा, अयोध्या, मथुरा, कांची, वत्सगुल्म ही नवी शैक्षणिक केंद्रे भरभराटीला आली. गुप्तांची राजधानी उज्जयानी सर्व प्रकारच्या विद्येचे माहेरघर बनले होते. कुमारगुप्ताच्या काळात उत्कर्षाच्या शिखरावर पोहचलेल्या नालंदा विद्यापीठाचा उदय एक बौध्द विद्यापीठ म्हणुन याच काळात झाला. तर दक्षिण भारतात वाकाटकांची राजधानी असलेले वत्सगुल्म हे शिक्षणाचे मोठे केंद्र बनले.

### इ) हर्षवर्धनकालीन शिक्षण –

ह्या काळात शिक्षण, साहित्य व कलेच्या क्षेत्रात भारताची चांगलीच उन्नती झाली. गुरूकुलाची परंपरा असुन शिक्षणाचे कार्य ब्राम्हणवर्ग करीत होता. वेदविद्या व विविध शास्त्रांच्या शिक्षणासोबतच व्यवसायशिक्षणही दिले जाई. ज्ञानार्जनासाठी दुरदूरच्या देशांतुन लोक भारतात येत होते. चिनी यात्रेकरू हयुएनत्संग याच काळात भारतात आला. त्याच्या

प्रवासवृत्तावरून शिक्षणाविषयी बरीच माहीती उपलब्ध होते. सम्राट हर्षवर्धनने शिक्षणावर व विद्याकलांवर खूपच खर्च केला. या काळात स्त्रियांना शिक्षणाचे स्वातंत्र्य होते. त्यामुळे स्त्रीयांमध्येही विद्वता निर्माण झाली.

हया काळात नालंदा, गया, प्रयाग, कनोज, विक्रमशिला ही शैक्षणिक केंद्रे नावारूपाला आली. त्यात नालंदाचे महत्व प्रचंड होते. ते प्रामुख्याने बौध्दांचे शिक्षणकेंद्र म्हणुन विकसित झाले. हर्षवर्धनाच्या आश्रयामुळे व जागतीक किर्तीच्या विद्वानांमुळे इ.स.च्या ७ व्या शतकात नालंदा हे एक जगप्रसिध्द विद्यापीठ बनले होते. हर्षवर्धनाने या विद्यापीठाच्या खर्चासाठी २२० गावाचे उत्पन्न जोडले होते. या विद्यापीठात प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्याला जेवण, राहणे व शिक्षण मोफत होते. शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी रंजक, रत्नदधी व रत्नसागर ही प्रचंड ग्रंथालये होती. या विद्यापीठात मध्यआशिया, सिलोन, ब्रम्हदेश, तिबेट, जावा, सुमात्रा, चीन अशा दूरदूरच्या देशातुन विद्यार्थी येत असत. या विद्यापीठातील विद्वान म्हणजे आचार–विचार, चारित्र्य गुणांचे आदर्श होते. त्यांचा विदेशातही सन्मान होता.

हर्षवर्धनाच्या काळात नालंदा खालोखाल विक्रमशिला विद्यापीठाचाही विकास झाला. तेथील भव्य वास्तू, प्रशासन, शिकविल्या जाणारे विषय, विद्वान आचार्य, प्रवेशपरिक्षा, भोजन, निवास नि:शुल्क हे सर्वकाही नालंदासारखेच होते.

हर्षवर्धनाचे समकालीन दक्षिण भारतातील चालुक्य, राष्ट्रकुट व चोल घराण्यातील शासकांनीही शिक्षण विकासाला चांगला हातभार लावला. संस्कृत मुख्य भाषा असुन शिक्षणाच्या स्वतंत्र पाठशाळा व मंदिरांतुन शिक्षण दिले जाई. वेदांसोबतच पुराणे, धर्मशास्त्र, व्याकरण, मिमांसा, इतिहास हे विविध विषय शिकविले जात. शिक्षणाचे कार्य करणाऱ्या ब्राम्हणांना राजांकडून अग्रहार दिले जाई. पैठण, मदुरा, कांची, वातापी ही दक्षिणेतील प्रमुख शिक्षण केंद्रे होती. कांची हे संस्कृत अध्ययनाचे प्रमुख केंद्र होते. पल्लव राजांनी तामीळ भाषेला उत्तेजन देऊन शिक्षण व साहित्यात भर घातली. चालुक्यांनीही वातापी (बदामी) च्या शिक्षणकार्याला मदत करून संस्कृतसोबतच कानडी भाषेला राजाश्रय दिला. तर चोल घराण्यातील राजेंद्र याने राजधानी गंगईकोंडचोलपुरम् येथे वेदाभ्यासासाठी महाविद्यालयाची निर्मीती केली.

प्राचीन भारतीय शिक्षणपध्दती ही विशाल दृष्टीकोनावर आधारीत होती. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरूषार्थाची उपासना व प्राप्ती करून घेणे हेही शिक्षणाचे प्रमुख ध्येय होते. शिक्षणामुळे विद्यार्थ्यांत नम्रता, सहनशीलता व संयमी वृत्ती निर्माण होते. आत्मसंयमनाबरोबर ब्रम्हज्ञानाची प्राप्ती करून घेणे या उद्देशाने शिक्षण दिले जाई. गुरू व मातापित्यांचा मान राखला गेला पाहीजे. याचे व्यवहारज्ञान विद्यार्थ्याला आवश्यक असे. एकुणच माणसाला बुध्दीमान, चारित्र्यसंपन्न व विवेकशिल करण्याकडे प्राचीन भारतीय शिक्षणपध्दतीचा कल होता. सामाजिक दर्जाचे प्रतिक संपत्ती व सत्ता नसुन विद्वत्ता होती.

**संदर्भ ग्रंथ सुची:**

1) आठवले डॉ. विभा - प्राचीन व मध्ययुगीन भारत, अंशुल पब्लिकेशन, नागपुर, 1999
2) वैद्य रवींद्र , शहा जी.बी., ढाले नामदेव, येवले प्रदीप - भारताचा इतिहास (प्रारंभ पासून ते इ.स. 1205), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव
3) दीक्षित नि.सी. - भारताचा इतिहास (प्रारंभ पासून ते इ.स. 1526), पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, 2011
4) महाजन समाधान- प्राचीन भारताचा इतिहास (कला व सांस्कृतिक घटकासह), युनिक अकॅडमी पब्लिकेशन, प्रा. लि., पुणे, 2020
5) दीक्षित नि.सी.- प्राचीन भारताचा इतिहास, पिंपळापुरे अँड कंपनी, नागपूर ,1993
6) Kapadia H. R. A. History of the Canonical Literature of the Jainas, Bombay, 1941
7) Winternitz, M.History of Indian Literature, Vol. ll, Calcutta, 1933.
8) https://mr.wikipedia.org/wiki.